Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 1, July 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

भारत–चीन संबध : एक दृष्टीक्षेप

मलदोडे एस.आर.

(राज्यशास्त्र विभाग)
श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा ता.लोहा
जि.नांदेड (महाराष्ट्र)

प्रस्तावना :–
चीन आणि भारत ही दोन राष्ट्रे नजीकच्या काळात महासत्ता म्हणून उदयाला येतील असे भाकीत केले जात आहे. पंरतू या दोन राष्ट्रांच्या विचारसणीतच मूलभूत फरक आहे. साम्राज्यवादी व आक्रमक असा चीनचा लाल रंग एकीकडे तर सहिष्णू व विश्वबंधुत्वाची कास धरणारा शांतताप्रिय केशरी रंग दुसरीकडे आहे. अशा या विचारधारेतील फरकामुळे चीन भारताच्या मित्रत्वासाठी हृदयापासून कधीच इच्छूक नव्हता.
प्रामुख्याने भारत–चीन संबंधाचे स्पश्टीकरण खालील प्रमुख पैलूंच्या आधारे करता येईल.

भारत–चीन समन्वयाची भूमिका (इ.स. 1949 ते 1960)

आक्टोबर 1949 मध्ये झालेल्या चीनमधील साम्यवादी क्रांतीचे भारताने स्वागत केले. बिगर साम्यवादी राष्ट्रामध्ये सर्वात पहिल्यांदा भारताने चीनच्या साम्यवादी व्यवस्थेला मान्यता दिली. अमेरिकेच्या नाराजीची पर्वा न करता भारताने कोरीया युद्धामध्ये चीनचे समर्थन केले. ऑक्टोबर 1954 मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरूंनी चीनच्या तिबेटवरील सत्तेचे समर्थन केले. 1955 मध्ये भरलेल्या बांडुंग परिशदेत नेहरू आणि चाऊ एन लाय यांनी पूर्ण सहकार्याने काम केले. त्याचाच एक भाग म्हणून गोवा प्रश्नावर चीनने भारताची बाजू घेतली या काळात हिंदी चीनी भाई–भाई च्या नाऱ्यामुळे उभय देशामध्ये काहिसे मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध राहिले.

भारत–चीन संबंधातील तणाव (इ.स. 1962 ते 1990)

1960 च्या दशकातील अमेरिकेचे भारतातील राजदूत प्रा.जॉन केनेथ गॅलब्रेथ यांनी भारत आणि चीन युद्धामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. 20 ऑक्टोबर 1962 या दिवशी थांगला खिंडीतून चीनने भारतावर आक्रमण केले आणि भारताला पूर्णपणे बेसावध असताना कोंडीत पकडले. चीन असे आक्रमण करील असे नेहरूंना कधीच वाटले नव्हते. कारण भारताने कोणत्याच राष्ट्रगटात सामीन न होता आपले अलिप्ततेचे धोरण असल्याचे जगजाहिर केले होते. परिणामी लश्करी तयारीकडे दुर्लक्ष केले गेले होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या वरील धोरणामुळे आपल्याला जागतिक समर्थन मिळेल असे वाटत होते. पंरतु इंग्लड सोडून भारताला कोणत्याच राष्ट्राने समर्थन दिले नव्हते. याकाळात भारताचे तत्कालीन संरक्षणमंत्री कृष्णमेनन यांच्यावर सर्वत्र अतिशय जोरदार टीका होत असतांना गॅलब्रेथनी भारताला आपल्या देशातर्फे मदतीचे आश्वासन दिले. पुढे गॅलब्रेथनी असे म्हटले आहे की, भारतातील दुसऱ्या कुणावरही नसेल इतके नेहरूंवर अमेरिकन जनतेचे प्रेम आहे.

21 नोव्हेंबरला चीनने एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली आणि 1 डिसेंबरला नेफातून आपण पूर्ण माघार घेवू असे सांगितले. यावर गॅलब्रेथनी म्हटले आहे, 'रात्री जसा चोर येतो तशी त्यानंतर शांतता आली'. या प्रकरणात भारताची पुर्णपणे नामुष्की झाली. पण गॅलब्रेथनी हे प्रकरण अतिशय कौशल्याने हाताळले. राजदूताच्या भूमिकेबद्दल बोलतांना स्वतः गॅलब्रेथ असे म्हणतात की, "The Job of ambassador is much like that of an airline pilot there are hours of boredom and minutes of panic." (राजदुताचे काम हे बरेचसे विमानाच्या पायलटसारखे असते, असंख्य कंटाळवाणे तास आणि विलक्षण घबराटीचे काही क्षण.)

Please cite this Article as : *मलदोडे एस.आर. ,भारत–चीन संबध : एक दृष्टीक्षेप* **: Golden Research Thoughts (July; 2012)**

सन 1962 च्या युद्धानंतर भारत आणि चीनमधील राजनैतिक पातळीवरील संबंध 1970–71 पर्यंत खंडीत होते. कारण दरम्यानच्या काळात चीन आणि पाकिस्तानमधील संबंध वृद्धींगत होत गेले. याचाच एक भाग म्हणून चीनने 1965 आणि 1971 च्या भारत पाकिस्तान युद्धात पाकिस्तानची बाजू उचलून धरली होती. तसेच चीनची काश्मिर बाबतची भूमिकाही पाकिस्तान धार्जिणी होती. 1974 मध्ये भारताने राजस्थानमधील पोखरण येथे केलेले अनुपरिक्षण आणि सिक्कीमचे भारतात विलीणीकरण या दोन घटना उभय देशात तणाव निर्माण करणाऱ्या होत्या. 1975 मध्ये भारताचे चीनमधील राजदूत म्हणून श्री के.आर.नारायणन यांची नेमणूक करण्यात येवून दोन्हीही देशातील राजनैतिक पातळीवरील संबंध सुधारले.

चीन आणि इतर देशांच्या सिमानिश्चितीचा वादः

चीन हा जगातील एकमेव असा देश आहे की, ज्यांचे पंधरा देशाबरोबर सिमा निश्चितीला धरून वाद आहेत. यात रशिया, भारत, जपान, कोरीया, फिलीपाईन्स, ब्रुनेई, मलेशिया, इंडोनिशिया, व्हीयतनाम इ. चीनने सिमावाद सोडविण्यासाठी बळाचा वापर केल्यामुळे शेजारी राष्ट्रांमध्ये चीनविषयी भिती आणि अविश्वासाचे वातावरण आहे. 1979 मध्ये चीन व्हियतनाममध्ये बळाचा वापर केला. चीनच्या या अरेरावी धोरणामुळे दक्षिणपूर्व आशियातील अनेक राश्ट्रांनी अमेरिकेशी करार केलेले आहेत. चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी या राष्ट्रांनी 'एशियन रिजनल फोरम' नावाची एक संघटना निर्माण केली आहे आणि भारताकडे या संघटनेचे सदस्यत्व आहे.

भारताने तिबेटविषयी आणि विशेशतः दलाई लामाविषयी घेतलेल्या भूमिकेमुळे भारत आणि चीन संबंधात कटुता निर्माण झाली. चीन पाकिस्तानला अण्वस्त्र तंत्रज्ञान आणि क्षेपणास्त्र पुरवत असल्यासंबंधी सबळ पुरावे भारताकडे असल्यामुळे चीनविशयी अविश्वास भारतात निर्माण झाला आहे. 1998 मध्ये भारत अण्वस्त्रधारी झाल्यानंतर भारत–चीन संबंध पुन्हा एकदा तणावपूर्ण झाले होते. भारताचे तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडीस यांनी चीनला शत्रूराष्ट्राचा दर्जा दिल्यामुळे सीमावादाविषयीच्या बोलण्यात त्याचे पडसाद उमटले.

भारत–चीन सहकार्याचे संबंध (इ.स.1991 ते 2006)

सन 2005 नंतर चीनने आपल्या धोरणामध्ये लवचिकता आणली आहे. ही लवचिकता नोव्हेंबर 2006 मध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष हु जिंताओ यांच्या भारत भेटी दरम्यान अणुइंधन सहकार्यासंबंधी दोन्ही देशांमध्ये झालेल्या करारातून दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणून चीनने आता अनुइंधन क्षेत्रात भारताबरोबर सहकार्य करण्याचे धोरण अवलंबिले आहे. (Nuclear Energy Co-operation with India)

अणुइंधन क्षेत्रातील सहकार्यामुळेच उभय राष्ट्रांचे पश्चिम आशियातील तेलावरचे परावलंबित्व कमी होणार आहे. याबरोबरच 1991 ते 2006 या दरम्यान दोन्ही राष्ट्रांमध्ये व्यापार वाढीसाठी जकातकर कमी करण्याविषयी अनेक करार झालेले असून या कराराचा परिणाम म्हणजे दोन्ही देशामधील व्यापार हा दहा अब्ज डॉलरपेक्षाही अधिक झाला. 11 डिसेंबर 2011 रोजी चीनला विश्वव्यापार संघटनेचे सदस्यत्व मिळाले तेव्हापासून भारत आणि चीन या दोन देशामधील आर्थिक व व्यापारी हितसंबंध सुधारले.

चीनचा बदलता दृष्टीकोण (इ.स. 2006 नंतर)

डिसेंबर 2011 मध्ये भारतीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी भारतावरील चीनच्या हल्याची शक्यता फेटाळून लावली. कथीत घुसखोरी ही सीमावादाचा परिणाम आहे असे त्यांना वाटते. पंरतू समाजवादी पार्टीचे नेते मुलायमसिंग यादव यांनी भारतीय सेनेचा हवाला देत चीन भारतावर हल्ला करण्याच्या तयारीत आहे. सरकार मात्र हातावर हात ठेवून गप्प आहे अशी भूमिका घेतली. भारताचे संरक्षण मंत्री ए.के. ॲन्टोनी यांनी मागील हिवाळी अधिवेशनात चीन भारताला लागून असलेल्या त्यांच्या सीमा क्षेत्रात रस्ते, रेल्वेस्थानक व विमानतळ यासारख्या पायाभूत सोयी निर्माण करीत आहे, हे मान्य केले आणि भारत देखील आपल्या सीमाभागात पायाभूत सोयीसुविधा विकसीत करणार आहे व हे विकासकाम जम्मूकाश्मिर, हिमाचलप्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम व अरूणाचलप्रदेश या भागात सुरू असल्याचे व्यक्त केले.

अलिकडेच पुन्हा एकदा चीन हा देश आक्रमक आणि साम्राज्यवादी भूमिकेचा आहे याची भारताला साक्ष पटली. भारतीय गुप्तचर खात्याने असे स्पष्ट केले आहे की, चीन पाकिस्तानच्या दाट मैत्रीचा फायदा घेवून पाकच्या आयएसआय गुप्तचर संघटनेद्वारे भारतात हेरगीरी करत आहे. आयएसआयकडून भारतातील तिबेटी नागरिकांच्या हालचालीवर बारिक लक्ष ठेवून त्याची माहिती चीनला पुरविली जाते. अलिकडच्या काळात भारताच्या वाढत्या शक्तीमुळे चीन हा देश चिंतीत आहे.

भारताचे संरक्षण मंत्री ए.के. ॲन्टोनी यांच्या नुकत्याच झालेल्या अरूणाचल प्रदेश दौऱ्यावरून चीनमध्ये तांडव निर्माण झाले. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते हाँग ली यांनी भारताचा अरूणाचल प्रदेश हा चीनचाच भाग असल्याचे स्पष्ट केले. अरूणाचल प्रदेशामध्ये आयोजीत कार्यक्रमात भारताने आपला सहभाग असल्याचे स्पष्ट केल्यानंतर चीनने यावर आक्षेप घेवून अशी भूमिका व्यक्त केली की, उभय देशातील संबंध चांगले आणि कायम शांतीपूर्व राहण्यासाठी भारताने चीनला मदत करावी. असे असले तरीही यापूर्वीच भारताच्या पंतप्रधानांनी भारतीय संविधानानुसार अरूणाचल प्रदेश हा भारताचाच भाग असून भारताच्या संविधानानूसारच येथील निवडणूका घेतल्या जातात आणि प्रत्येक राजकीय घटना–घडामोडी घडतात असे स्पष्ट केले.

असे असले तरीही अमेरिकेचे गुप्तचर अधिकारी जेम्स क्लॅपर यांनी 'ड्रँगनशी मर्यादीत संघर्षाची तयारी भारतीय लष्करांनी करण्यास सुरूवात केली आहे' असे स्पष्ट केले. पंरतु चीनशी असलेल्या तणावाला आपण फारसे महत्व देत नाही असे भारतातर्फे सांगण्यात आले असले तरीही चीनच्या वाढत्या कारवायांनी भारत चिंतीत आहे असे (हिन्दी महासागर आणि आशिया पॅसिफीक विभाग) जेम्स क्लॅपर यांनी सांगितले.

मागील वर्षी चीनने परराष्ट्र धोरण जाहीर करतांना शेजारी देशांनी आणि जागतिक स्तरावर शांततापूर्ण संबंध ठेवण्याचे सुतोवाच होताच चीन आपले धोरण बदलण्यास मागेपुढे पाहणार नाही. अशी भूमिका क्लॅपरने घेवून पुढे असे म्हटले आहे की, त्यातून लष्करी क्षमता आणखी प्रभावी करण्याची तयारी चीनने सुरू केली आहे.

***निष्कर्ष*:**

भारत आणि चीन ही आशिया खंडातील दोन बडी राष्ट्र असून एकीकडे चीनची आक्रमक आणि साम्राज्यवादी राष्ट्र म्हणून पूर्वीपासून जगाला ओळख आहे. तर दुसरीकडे भारतासारख्या राष्ट्रांनी शांतता, अहिंसा, मानवता, विश्वबंधुता आणि जागतिक मानवी हक्काला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. उभय राष्ट्राची महासत्तेच्या दिशेने होणारी वाटचाल आणि त्याबाबतीत दोन्हीही राष्ट्रांनी स्विकारलेल्या मार्गामुळे दोन्हीही राष्ट्राची वेगळी प्रतिमा जागतिक स्तरावर निर्माण होवू पाहते असे असले तरी नेहरूंनी दोन्ही राष्ट्रांच्या हितासाठी स्विकारलेल्या पंचशील तत्वाची चीनने पुन्हा पायमल्ली करू नये. या विचारसरणीनूसारच चीनने आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण ठरवावे. यातच उभय राष्ट्राचे हित असून यामुळे आशिया खंडातील सर्वबाबतीत सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून दोन्हीही राष्ट्रांना महासत्तेच्या दिशेने वाटचाल करता येईल आणि यामुळेच युरोपीयन राष्ट्रांचा

उभय राष्ट्रांकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलेल यात शंका नाही.

संदर्भसूची :

1.आंतरराष्ट्रीय संबंध, डॉ.बी.एल. फडीया, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.
2.साप्ताहिक सकाळ, 21 एप्रिल 2001.
3.भारतीय परराष्ट्र धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर, डॉ.शैलन्द्र देवाळाणकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
4.आंतरराष्ट्रीय संबंध, डॉ.शैलेन्द्र देवळाणकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
5.दैनिक लोकमत, दि.15 जानेवारी 2011.
6.दैनिक लोकमत, दि.19 जानेवारी 2012.
7.दैनिक लोकमत, दि.27 फेब्रुवारी 2012.
8.दैनिक लोकमत, दि.2 फेब्रुवारी 2012.